# महाराष्ट्र शासन

# सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,मुंबई

Web Side- www.jdteromumbai.com Email-jtdirrom@gmail.com

दूरध्वनी क्रमांक – (०२२) २६४७४८९२ / २६४७१६१९

## गट ‘क’ व गट- ‘ड’ संवर्गातील अपंगाचा व मागासवर्गीयांचा अनुशेष तसेच खुल्या प्रवर्गातील रिक्त पदांसाठी जाहिरात.

सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, मुंबई या कार्यालयाच्या अंतर्गत अपंग, मागासवर्गीय व खूल्या प्रवर्गाकरीता रिक्त असलेल्या पदांकरिता निवड व प्रतिक्षायादी तयार करणेसाठी इच्छुक उमेदवारांकडून दिनांक-२३/१२/२०१३ ते ०६/०१/२०१४ संध्याकाळी ५.०० वाजेपर्यंत ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत. अर्जाचे लिफाफ्यावर ठळक अक्षरात “---------------------------- या पदासाठी अर्ज” असे लिहिण्यात यावे.

| अ.क्रं | पदाचे नांव व वेतनश्रेणी / ग्रेड पे | समांतर आरक्षण | अ.जा. | अ.ज. | विजा (अ) | भ.ज. (ब) | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | विमाप्र | इमाव | खुला | एकूण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | **संवर्ग – गट-क** | | | | | | | | | | | |
| १. | लिपिक-टंकलेखक<br>**Clerk-cum-Typist**<br>(वेतनबॅण्ड रु.५२००-२०२००, ग्रेड पे-१९००)<br>**(Pay Band Rs.5200-20200/- Grade Pay Rs.1900/-)**<br>ग्रामीण संवर्गातील लिपिक-टंकलेखकांची पदे (मुंबई शहर व उपगनर वगळून) | माजी सैनिक | - | - | - | - | - | - | - | - | १ | ७ |
| | | सर्वसाधारण | - | १ | १ | - | - | - | १ | २ | १ | |
| २. | वरिष्ठ लिपिक<br>**Senior Clerk**<br>(वेतनबॅण्ड रु.५२००-२०२००, ग्रेड पे-२४००)<br>**(Pay Band Rs.5200-20200/- Grade Pay Rs.2400/-)**<br>ग्रामीण संवर्गातील वरिष्ठ लिपिकांची पदे (मुंबई शहर व उपगनर वगळून) | सर्वसाधारण | १ | - | - | - | - | - | - | - | - | १ |
| ३. | भांडारपाल<br>**Store Keeper**<br>(वेतनबॅण्ड रु.५२००-२०२००, ग्रेड पे-२८००)<br>**(Pay Band Rs.5200-20200/- Grade Pay Rs.2800/-)** | सर्वसाधारण | - | - | - | - | - | - | - | - | १ | १ |
| ४. | वीजतंत्री<br>**Electrician**<br>(वेतनबॅण्ड रु.५२००-२०२००,ग्रेड पे-२४००)<br>**(Pay Band Rs.5200-20200/- Grade Pay Rs.2400/-)** | सर्वसाधारण | - | - | - | - | - | - | - | - | १ | २ |
| | | खेळाडु | - | - | - | - | - | - | - | - | १ | |
| ५. | प्रयोगशाळा सहाय्यक<br>**Lab Assistant**<br>(वेतनबॅण्ड रु.५२००-२०२००,ग्रेड पे-२०००)<br>**(Pay Band Rs.5200-20200/- Grade Pay Rs.2000/-)** | सर्वसाधारण | - | १ | - | - | - | - | - | १ | ७ | १० |
| | | महिला | - | - | - | - | - | - | - | - | १ | |
| ६. | तांत्रिक प्रयोगशाळा सहाय्यक<br>**Technical Lab Assistant**<br>(वेतनबॅण्ड रु.५२००-२०२००,ग्रेड पे-२४००)<br>**(Pay Band Rs.5200-20200/- Grade Pay Rs.2400/-)** | सर्वसाधारण | १ | १ | - | - | - | - | - | - | ९ | १२ |
| | | अपंग (अस्थीव्यंग OL कर्णबधीर HH क्षीणदृष्टी LV) | - | - | - | - | - | - | - | - | १ | |

| अ. क्रं | पदाचे नांव व वेतनश्रेणी / ग्रेड पे | समांतर आरक्षण | अ.जा. | अ.ज. | विजा (अ) | भ.ज. (ब) | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | विमाप्र | इमाव | खुला | एकूण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ७. | कुशल कारागीर (चर्मकला)<br>**Skilled Workman (Leather)**<br>(वेतनबॅण्ड रु.५२००-२०२००,ग्रेड पे-१९००)<br>**(Pay Band Rs.5200-20200/- Grade Pay Rs.1900/-)** | सर्वसाधारण | - | १ | - | - | - | - | - | - | - | १ |
| ८. | लोहार<br>**Black Smith**<br>(वेतनबॅण्ड रु.५२००-२०२००,ग्रेड पे-२४००)<br>**(Pay Band Rs.5200-20200/- Grade Pay Rs.2400/-)** | सर्वसाधारण | - | - | - | - | - | - | - | - | १ | १ |
| ९. | यंत्रपरीचर (मुद्रण)<br>**Machine Attendent (Printing)**<br>(वेतनबॅण्ड रु.५२००-२०२००,ग्रेड पे-१९००)<br>**(Pay Band Rs.5200-20200/- Grade Pay Rs.1900/-)** | सर्वसाधारण | - | - | - | - | - | - | १ | - | २ | ३ |
| १० | प्रयोगशाळा सहाय्यक (फार्मसी)<br>**Lab. Assistant (Pharmacy)**<br>(वेतनबॅण्ड रु.५२००-२०२००,ग्रेड पे-२४००)<br>**(Pay Band Rs.5200-20200/- Grade Pay Rs.2400/-)** | सर्वसाधारण | १ | १ | - | - | - | - | - | - | ३ | ५ |
| | **संवर्ग – गट-ड** | | | | | | | | | | | |
| १. | शिपाई / ग्रंथालय शिपाई<br>**Peon / Library Peon**<br>(वेतनबॅण्ड रु.४४४०-७४४०,ग्रेड पे-१३००)<br>**(Pay Band Rs.4440-7440/- Grade Pay Rs.1300/-)** | सर्वसाधारण | - | १ | - | - | - | - | - | - | २ | ४ |
| | | महिला | - | - | - | - | - | - | - | - | १ | |
| २. | प्रयोगशाळा परिचर<br>**Laboratory Attandant**<br>(वेतनबॅण्ड रु.४४४०-७४४०,ग्रेड पे-१३००)<br>**(Pay Band Rs.4440-7440/- Grade Pay Rs.1300/-)** | सर्वसाधारण | २ | - | - | - | १ | - | - | ३ | ३ | १० |
| | | महिला | - | - | - | - | - | - | - | - | १ | |
| ३. | हमाल<br>**Hamal**<br>(वेतनबॅण्ड रु.४४४०-७४४०,ग्रेड पे-१३००)<br>**(Pay Band Rs.4440-7440/- Grade Pay Rs.1300/-)** | सर्वसाधारण | - | - | - | - | १ | - | - | - | - | १ |

टिप :- सदरच्या जाहिरातीमध्ये दर्शविलेल्या रिक्त पदांच्या संख्येत कमी / जास्त बदल होण्याची शक्यता आहे. काही अपरिहार्य कारणाने परीक्षा स्थगित झाल्यास त्याबाबत अर्जदाराला कोणताही दावा सांगता येणार नाही. परीक्षेचा प्रकार, पदांची संख्या, समातंर आरक्षण याबाबत बदल करणे, परिक्षा स्थगित करणे, अंशत: बदल करणे तसेच सेवाभरती प्रक्रियेत बदल करणे याबाबतचे सर्व अधिकार सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई हे स्वत:कडे राखून ठेवीत आहेत. भरती प्रक्रिये संदर्भात उद्‌भवणारे वाद, तक्रारी इत्यादीबाबत सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई यांचा निर्णय अंतिम राहील.

पदभरतीचे वेळापत्रक खालीलप्रमाणे.

१. ऑनलाईन अर्ज सादर करण्याचा दिनांक – दि.२३ डिसेंबर २०१३ ते दि.६ जानेवारी २०१४
२. ऑनलाईन पध्दतीने भरलेले अर्ज डि.डि. व प्रमाणपत्रांच्या प्रतीसहीत या कार्यालयात पोहोचण्याचा अंतिम दिनांक – दि.९ जानेवारी २०१४
३. पात्र व अपात्र उमेदवारांची यादी प्रसिध्द करण्याचा दिनांक – दि.११ जानेवारी २०१४
४. लेखी / प्रात्यक्षिक परीक्षेचा दिनांक – दि.१८ जानेवारी २०१४ व दि.१९ जानेवारी २०१४

पदनिहाय मुलाखतीकरीता पात्र ठरलेल्या उमेदवारांची यादी व पदनिहाय मुलाखतीचा दिनांक उमेदवारांच्या लेखी व प्रात्यक्षिक परीक्षेनंतर संकेतस्थळावर जाहिर करण्यात येईल.

उपरोक्त वेळापत्रकात काही प्रशासकीय / तांत्रिक कारणाने बदल झाल्यास वर नमूद केलेल्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

**उपनिर्दिष्ट सर्व पदांसाठी शैक्षणिक अर्हता, अनुभव आणि अन्य अटी खालीलप्रमाणे असतील.**

| अ.क्र. | पदनाम | किमान शैक्षणिक अर्हता |
|---|---|---|
| | | **गट-क** |
| १. | **लिपिक-टंकलेखक** | १.माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण. २.महाराष्ट्र स्टेट कौन्सिल ऑफ एक्झामिनेशन्स यांचेकडील शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र मराठी टंकलेखन ३० श.प्र.मि. किंवा इंग्रजी टंकलेखन ४० श.प्र.मि. परीक्षा उत्तीर्ण असलेले प्रमाणपत्र आवश्यक. |
| २. | **वरिष्ठ लिपिक** | १. कला, वाणिज्य, शास्त्र, कायदा यापैकी कोणत्याही शाखेतील मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवी उत्तीर्ण. २. शासकीय कार्यालय किंवा शासकीय उपक्रम किंवा व्यावसायिक आस्थापनामधील प्रशासकीय आणि/किंवा लेखाविषयक कामाबाबतचा एक वर्षाचा अनुभव आवश्यक. |
| ३. | **भांडारपाल** | १.माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण आणि अभियांत्रिकी भांडारातील भाडांरपालनाचा कमीत कमी २ वर्षाचा अनुभव. तसेच महाराष्ट्र स्टेट कौन्सिल ऑफ एक्झामिनेशन्स यांचेकडील शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र मराठी टंकलेखन ३० श.प्र.मि. व इंग्रजी टंकलेखन ४० श.प्र.मि.परीक्षा उत्तीर्ण असलेले प्रमाणपत्र आवश्यक. |
| ४. | **वीजतंत्री** | १.माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण, २. सार्वजनिक बांधकाम विभागाचे पर्यवेक्षक (प्रथम श्रेणी) प्रमाणपत्र आवश्यक किंवा आय.टी.आय. वीजतंत्री प्रमाणपत्र किंवा एन.सी.टी.व्ही.टी. वीजतंत्री प्रमाणपत्र.३. संबंधीत क्षेत्रातील एक वर्षाचा शिकविण्याचा / प्रात्यक्षिक (औद्योगिक)अनुभव |
| ५. | **प्रयोगशाळा सहाय्यक** | १.माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण.<br>प्रयोगशाळेतील प्रात्यक्षिके घेण्याचा अनुभव असल्यास प्राधान्य. |
| ६. | **तांत्रिक प्रयोगशाळा सहाय्यक** | १.माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण. २. अभियांत्रिकी शाखेतील पदविका अभ्यासक्रम उत्तीर्ण ३.संबधित क्षेत्रातील १ वर्षाचा प्रयोगशाळा सहाय्यक / मॅन्युफॅक्चरिंग / सर्व्हिसिंग / मेन्टेनन्स / डिझाईन अनुभव व **C.N.C.** मशीन हाताळण्याचा अनुभव आवश्यक. |
| ७. | **कुशलकारागीर (चर्मकला)** | १.माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण. २. लेदर टेक्नॉलॉजीमधील प्रमाणपत्र वा समतूल्य परीक्षा उत्तीर्ण.<br>३.कमर्शीयल टॅनरीमधील कामाचा १ वर्षाचा अनुभव आवश्यक. |
| ८. | **लोहार** | १.माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण २. आय.टी.आय. लोहार अभ्यासक्रम उत्तीर्ण किंवा समकक्ष अभ्यासक्रम उत्तीर्ण (उदा.फोर्जीग ॲण्ड हिट ट्रिटमेंट) किंवा एन.सी.टी.व्ही.टी. लोहार किंवा समकक्ष अभ्यासक्रम उत्तीर्ण |
| ९. | **यंत्रपरीचर (मुद्रण)** | १.माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण, २. मुद्रणशास्त्रातील प्रमाणपत्र वा समतूल्य अभ्यासक्रम उत्तीर्ण.<br>३.मुद्रणालयातील मशीनची माहिती व दुरुस्ती करण्याचा एक वर्षाचा अनुभव आवश्यक. |
| १०. | **प्रयोगशाळा सहाय्यक (फार्मसी)** | १.माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण.<br>२.औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाची पदविका परीक्षा उत्तीर्ण.<br>३.कमीत कमी ३ वर्ष औषधनिर्माणशात्र प्रयोगशाळा या तत्सम ठिकाणी कामाचा अनुभव आवश्यक |
| | | **गट-ड** |
| ११. | **शिपाई / ग्रंथालय शिपाई** | शासनमान्य शाळेतील इयत्ता ४थी परीक्षा उत्तीर्ण. |
| १२. | **प्रयोगशाळा परिचर** | शासनमान्य शाळेतील इयत्ता ७वी परीक्षा उत्तीर्ण. |
| १३. | **हमाल** | शासनमान्य शाळेतील इयत्ता ४थी परीक्षा उत्तीर्ण. |

**१. सर्व उमेदवारांनी www.jdteromumbai.com या संकेतस्थळावर जाऊन अर्ज ऑनलाईन पध्दतीने भरुन भरलेल्या अर्जाची मुद्रीत प्रत (Print Copy) काढुन आवश्यक सर्व कागदपत्रांसह व डी.डी. (धनाकर्ष) सहीत उशीरात उशीरा दि.९.१.२०१४ संध्याकाळी ५.०० वाजेपर्यत या कार्यालयास प्राप्त होईल या बेताने पाठविण्यात यावी.**

**२. माजी सैनिक कार्यालय, रोजगार व स्वयंरोजगार कार्यालय, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय यांचेकडे नोंदणी केलेले व त्या कार्यालयाने शिफारस केलेल्या यादीतील समाविष्ट असलेल्या उमेदवारांनी सुध्दा ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरणे आवश्यक आहे.**

<u>सर्वसाधारण अटी-</u>

१) अ)उमेदवाराचे वय दि.१.१.२०१४ रोजी किमान १८ वर्षे व कमाल ३३ वर्षे.(मागासवर्गीयांकरिता ३८ वर्षे.)

ब) माजी सैनिक व अपंग यांचे बाबतीत ४५ वर्ष पर्यत कमाल वयोमर्यादा.

क) खेळाडुसाठी त्यांची गुणवत्ता व पात्रता विचारात घेऊन उच्च वयोमर्यादा ५ वर्षापर्यत शिथिलक्षम राहील.

ड) शासकीय कार्यालयातील कर्मचा-यांच्या बाबतीत उच्चतम वयोमर्यादा लागू असणार नाही.

इ) खुल्या प्रवर्गाकरीता आरक्षित असलेल्या पदाकरीता मागासवर्गीय उमेदवाराने (ज्या उमेदवाराचे वय ३४ ते ३८ च्या दरम्यान आहे) अर्ज केला तर संबधित उमेदवाराकडे जात वैधता प्रमाणपत्र अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे. तसेच संबधीत मागासवर्गीय उमेदवाराकडे दि.३१ मार्च २०१४ पर्यत वैध असलेले नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

२) उमेदवारांना मराठी भाषेचे पर्याप्त ज्ञान असणे आवश्यक.

३) शासन अधिसूचना एसआरव्ही २०००/प्रक्र(१७/२०००)/बारा, दि.२८.३.२००५ नुसार नमुना "अ" नियम ४ प्रमाणे लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन अर्जासोबत सादर करणे आवश्यक राहील. अर्जाचा नमुना संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

४) शासन निर्णय क्र.अनियो १००५/१२६/सेवा-४, दि.३१.१०.२००५ प्रमाणे परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजना लागू राहिल.

५) वित्त विभाग परिपत्रक क्रमांक अनियो१००६/८७/सेवा-४ दि.१२ जानेवारी २००७ व वित्त विभाग परिपत्रक क्रमांक अनियो१००९/१३/सेवा-४ दि.२४ फेब्रुवारी २००९ मधील सर्व अटींची पुर्तता होत असल्यासच शासकीय कर्मचा-यास महाराष्ट्र नागरी सेवा(निवृत्ती वेतन) नियम १९८२ व सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजना लागु होईल.

६) अ) शासन निर्णय क्रं.रिपभ/प्र.क्र.६६/२०११/ई-१०, दि.२७ जून २०११ नुसार ज्या उमेदवारांकडे अधिवास प्रमाणपत्र (**Domicile Certificate**) उपलब्ध नसल्यास त्यांनी त्यांचा जन्म महाराष्ट्र राज्यात झाला असल्याचा जन्म दाखला सादर करणे आवश्यक आहे. अशा प्रकरणात अधिवास प्रमाणपत्राची अट लागू राहणार नाही.

ब) सदर उमेदवाराकडे अधिवास प्रमाणपत्र तसेच जन्मतारखेचा दाखला उपलब्ध नसल्यास त्या उमेदवाराने आपला शाळा सोडल्याचा दाखला सादर करणे आवश्यक राहील. परंतु सदर शाळा सोडल्याच्या दाखल्यामध्ये त्या उमेदवाराचा जन्म महाराष्ट्र राज्यात झाला असल्याची नोंद असणे आवश्यक आहे. अशा प्रकरणातदेखील अधिवास प्रमाणपत्राची आवश्यकता असणार नाही.

क) उपरोक्त बाबी फक्त महाराष्ट्र राज्यात जन्म झालेल्या उमेदवारांसाठी लागू राहतील. इतर उमेदवारासाठी अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate) आवश्यक राहील.

**७) उमेदवाराने अर्ज केला अथवा विहित अर्हता धारण केली म्हणजे परीक्षेला बोलावण्याचा अथवा नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला असे नाही.**

**८) महाराष्ट्र शासन राजपत्र दि.२२ जानेवारी २००४ च्या कलम ४(३) अन्वये विजा/भ.ज. प्रवर्गातील पदे प्रवर्गासाठी विहित केलेले आरक्षण अंतर्गत परिवर्तनीय असेल.**

**९) समांतर आरक्षणातील योग्य उमेदवार उपलब्ध न झाल्यास संबंधीत प्रवर्गातील सर्वसाधारण उमेदवाराचा त्यासाठी विचार केला जाईल.**

१०) मागासवर्गातील उमेदवारांनी अर्जासोबत सक्षम अधिका-यांनी दिलेल्या जातीच्या प्रमाणपत्राची साक्षांकित छायाप्रत व उपलब्ध असल्यास जाती वैधतेच्या प्रमाणपत्राची साक्षांकित छायाप्रत जोडणे आवश्यक आहे.

११) मागास प्रवर्गातील आरक्षण हे महाराष्ट्र राज्याच्या अधिवासी उमेदवारापुरते मर्यादित राहील.

१२) सर्व पदासाठी एमएससीआयटी अथवा D.O.E.A.C.C. सोसायटीच्या अधिकृत C.C.C किंवा O स्तर किंवा A स्तर किंवा B स्तर किंवा C स्तर पैंकी कोणतीही एक प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण हि अनिवार्य अर्हता निश्चीत केलेली असल्याने ते प्रमाणपत्र अर्जासोबत सादर करणे आवश्यक आहे. जर विहित प्रमाणपत्र नसल्यास, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.प्रशिक्षण २०००/प्र.क्र.६१/२००१/३९, दि.१९.३.२००३ नुसार नियुक्तीच्या दिनांकापासून दोन वर्षाच्या आत विहित प्रमाणपत्र उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. विहित मुदतीत संगणक हाताळणी/ वापराबाबतचे प्रमाणपत्र सादर न केल्यास तात्काळ सेवा समाप्त करण्यात येईल.

१३) अ) सामान्य प्रशासन विभाग, शा.नि.दिनांक १९.१०.२००७ मध्ये नमूद केलेल्या तरतुदीनुसार लेखी, प्रात्यक्षिक व मुलाखतकरीता गुणांचे विभाजन करण्यात येईल.

ब) लेखी परीक्षा व व्यावसायिक चाचणीतील गुणवत्तेनुसार १:५ या प्रमाणात अथवा सामान्य प्रशासन विभाग शा.नि.दिनांक १९.१०.२००७ व शा.नि.दि.२७.०६.२००८ मध्ये नमूद केल्याप्रमाणे प्रत्यक्ष मुलाखतीसाठी बोलाविण्यात येईल.

१४) अर्ज सर्व दृष्टींनी पूर्ण असावेत आणि विहित नमुन्यामध्ये नसलेले व अपूर्ण अर्ज फेटाळण्यात येतील.

१५) एकापेक्षा अधिक पदांकरिता अर्ज करावयाचा असल्यास प्रत्येक पदाकरिता स्वतंत्र अर्ज करावा.

**१६) जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार कार्यालयात नोंदणी केली असल्यास नोंदणी क्रमांक अर्जात नमूद करावा. व अद्यावत नोंद प्रमाणपत्राची छायांकित प्रत सादर करणे बंधनकारक राहिल.**

१७) शासकीय/ निमशासकीय अन्यथा अन्य प्रकारच्या नोकरीत असलेल्या उमेदवारांनी नियुक्ती अधिका-याचे मुलाखतीचे वेळी नाहरकत प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.अन्यथा मूलाखत नाकारली जाईल.ज्या पदासाठी केवळ लेखी परीक्षेच्या आधारे निवड करावयाची आहे अश्यांनी प्रमाणपत्रे तपासणीचे वेळी ना-हरकत प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील.

१८) उमेदवाराचा **पत्रव्यवहाराचा पत्ता सुस्पष्ट व सविस्तर** असावा.

**१९) अर्ज छाननी व नोंदणी शुल्क खुल्या संवर्गातील उमेदवारांना रुपये ४०० व मागासवर्गीय उमेदवारांसाठी रुपये ३००/- चा धनाकर्ष जोडणे आवश्यक आहे. तो " मुंबई " येथे देय असावा. धनाकर्ष "सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, मुंबई" (Joint Director, Technical Education, Regional Office, Mumbai) यांच्या नांवे काढण्यात यावा. सदर धनाकर्ष राष्ट्रीयकृत बँकेकडून निर्गमित केलेला असावा.**

**२०) उमेदवारांना लेखी/ चाळणी परीक्षा / प्रात्यक्षिक परीक्षेसाठी व मुलाखतीसाठी मुलाखती स्थळी स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल. त्यांची निवड झाल्यास या विभागाच्या अधीनस्त बृहन्मुंबईसह मुंबई (उपनगर), ठाणे, रायगड,रत्नागिरी, सिंधुदूर्ग या जिल्हयातील कोणत्याही कार्यालय/संस्थेमध्ये त्यांची नियुक्ती करण्यात येईल व त्यांची सेवा या विभागातील कोणत्याही कार्यालय/ संस्थेमध्ये बदली पात्र असेल.**

२१) वि.जा.व भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विमाप्र उमेदवारानी समाजाच्या उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे दि.३१ मार्च २०१४ पर्यतचे वैध असलेले नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे, अन्यथा त्याचा आरक्षित पदासाठी विचार केला जाणार नाही.

२२) अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडूसाठी असलेले आरक्षण शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रिडा विभाग क्रं.राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२, दि.३० एप्रिल २००५ मधील तरतुदीनुसार राहील. अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडूसाठी त्यांची गुणवत्ता व पात्रता विचारात घेऊन उच्च वयोमर्यादा ५ वर्षापर्यत शिथिलक्षम राहील. खेळाडू प्रमाणपत्र हे राष्ट्रीय व राज्यस्तरावरील (शासन निर्णय परिशिष्ठ अ मधील नमूद) खेळाचे व प्राधिकृत केलेल्या सक्षम अधिका-याचे असावे.

**२३) अर्ज "सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, जागतिक बँक प्रकल्पांतर्गत इमारत, पहिला मजला, शासकीय तंत्रनिकेतन परिसर, ४९, खेरवाडी, अलियावर जंग मार्ग, बांद्रा (पूर्व), मुंबई- ४०० ०५१" या पत्त्यावर पाठवावेत. व पाकिटावर पदाचे नाव स्पष्ट व ठळक अक्षरात लिहावे.**

२४) पोस्टाची दिरंगाई अथवा इतर अन्य कोणत्याही कारणामुळे विहित मुदतीनंतर प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार न करता ते रद्द ठरविण्यात येतील.

२५) अर्जामध्ये भरलेल्या माहितीच्या पृष्ठयर्थ आवश्यक त्या प्रमाणपत्राच्या साक्षांकित प्रती अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे. अन्यथा असे अर्ज रद्दबातल ठरविले जातील.

**२६) जाहीरातीत नमूद अर्हता किमान शैक्षणिक अर्हता दर्शवितात. त्यापेक्षा उच्च अर्हताधारक उमेदवारांना प्राधान्य दिले जाईल.**

२७) शासन तरतूदीनूसार अपंग, माजी सैनिक, खेळाडु इत्यादींना वयोमर्यादेत अनुज्ञेय असलेली सूट संबधित प्रवर्गातील उमेदवारांसाठी लागू राहील.

२८) पूर्णवेळ कामाचा अनुभव ग्राहय धरला जाईल. अर्धवेळ मानधनावरील सेवा ग्राहय धरली जाणार नाही.

२९) महिला आरक्षणाची तरतूद शासन निर्णय महिला व बालकल्याण विभाग ८२/२००१/मसेआ-२०००/प्र.क्र.४१५/का-२ दि.२५ मे २००१ नुसार राहील.

३०) निवड प्रक्रियेदरम्यान व तदनंतर उमेदवारांनी सादर केलेली प्रमाणपत्रे संशयास्पद वा अयोग्य / अपर्याप्त आढळल्यास उमेदवारांची निवड / नियुक्ती कोणत्याही टप्प्यावर रद्द केली जाईल.

३१) पदभरतीबाबतचे संपूर्ण वेळापत्रक **www.jdteromumbai.com** या संकेतस्थळावर घोषित करण्यात येईल. व त्याबाबत स्वतंत्र पत्रव्यवहार केला जाणार नाही.

३२) उमेदवारांनी अर्जासोबत माहिती सादर करतांना सदर कार्यान्वित असलेला भ्रमणध्वनी (मोबाईल) क्रमांक व ई-मेल आयडी नमूद करावा, जेणेकरुन आपणांस संपर्क करुन आवश्यक ती माहिती देणे सुलभ होईल.

**विशेष सूचना**

१) सदरहू जाहिरातीला अनुसरुन ज्या उमेदवारांचे ऑनलाईन पध्दतीने भरलेले अर्ज विहित मुदतीत या कार्यालयास प्राप्त होतील केवळ अशाच उमेदवारांचे अर्ज विचारात घेतले जातील. अन्य कोणत्याही संदर्भातील यापूर्वी या कार्यालयास प्राप्त झालेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत याची कृपया नोंद घ्यावी.

२) अर्जांची संख्या जास्त असल्यास निकष ठरवून त्याआधारे अर्जाची छाननी करुन उमेदवाराची संख्या मर्यादित केली जाईल व त्यानंतर आवश्यकतेनूसार लेखी परीक्षा व प्रात्यक्षिक परीक्षा घेवून त्या आधारे मर्यादित उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलाविले जाईल.

३) परीक्षेकरिता येताना उमेदवारांनी ओळखपत्र म्हणून पॅन कार्ड/आधार कार्ड/वाहन चालविण्याचा परवाना/पासपोर्ट/मतदान कार्ड यापैकी एक पुरावा म्हणून सोबत आणावे.

४) अतिरिक्त संवर्ग, आंतरविभागीय समायोजन व विभागीय बदली / पदांचा आढावा व पदांचे पुनर्जिवन न होणे इ. वा अन्य कारणामुळे पदसंख्येत (पदसंख्या कमी / जास्त वा शुन्य होणे) व आरक्षण/ समांतर आरक्षणामध्ये बदल होण्याची शक्यता आहे. तसेच या व अन्य कारणामुळे निवड प्रक्रिया कोणत्याही टप्प्यावर रद्द केली जाईल.

५) पदभरतीची प्रक्रिया अत्यंत तर्कशुध्द व पारदर्शक पध्दतीने गुणवत्तेच्या आधारे पार पाडली जाणार असल्याने कोणीही कोणत्याही प्रलोभनाला बळी पडू नये.

**६) निवडीसाठी मा.मंत्री महोदय, मा.खासदार, मा.आमदार, राजकीय पक्षांचे पुढारी , अधिकारी यांची शिफारस पत्रे अथवा दबाव आणल्यास उमेदवार निवड व नियुक्तीसाठी अपात्र ठरविला जाईल.**

७) रोजगार व स्वयंरोजगार कार्यालय व अन्य प्राधिकरणे यांचेकडून प्राप्त होणा-या यादीतील उमेदवारांनासुध्दा जाहीरातीतील सर्व सूचना / बाबी लागू होतील.

८) अर्ज स्विकारण्याच्या अंतिम तारखेपर्यत उमेदवारांनी धारण केलेली अर्हताच विचारात घेतली जाईल.त्यानंतर सादर केलेली कोणतीही कागदपत्रे विचारात घेतली जाणार नाही.

**९) निकषानुसार छाननीनंतर अपात्र ठरलेल्या उमेदवारांची नावे कार्यालयाचे www.jdteromumbai.com या संकेतस्थळावर दर्शविण्यात येतील. त्यासाठी स्वतंत्र पत्रव्यवहार केला जाणार नाही.**

**१०) जाहीरातीच्या अनूषंगाने कार्यवाही न करण्याचे वा ती रद्द करण्याचे अधिकार सहसंचालकांनी राखून ठेवले आहेत.**

**११) ऑनलाईन पध्दतीने अर्ज करण्याची पध्दत स्वतंत्र पानावर देण्यात येत आहे. काळजीपूर्वक वाचून कार्यवाही करावी.**

**स्वा/-**
**( जी.बी.धनोकार )**
**सहसंचालक,**
तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, मुंबई.

# महाराष्ट्र शासन
## सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,मुंबई

Web Side- www.jdteromumbai.com      Email-jtdirrom@gmail.com

दूरध्वनी क्रमांक – (०२२) २६४७४८९२ / २६४७१६१९


---

### ऑनलाईन पध्दतीने अर्ज करण्याची पध्दत खालीलप्रमाणे आहे.

१) उमेदवाराने पुर्ण जाहिरात वाचून झाल्यानंतर ऑनलाईन अर्ज भरण्याची कार्यवाही करावी.

२) ऑनलाईन अर्ज www.jdteromumbai.com या वेबसाईटवर उपलब्ध राहील.

३) पदासाठी उमेदवाराने ऑनलाईन अर्ज भरतेवेळी सर्व कागदपत्रे, स्वत:चा अलिकडील काळातील पासपोर्ट साईज फोटो व आवश्यक डी.डी.स्वत:जवळ असल्याची खात्री करावी.

४) उमेदवाराने ऑनलाईन अर्ज ज्या पदासाठी भरणार आहे. त्या पदाची पात्रता जाहिरातीमध्ये काळजीपूर्वक वाचावी.

५) **Online** अर्ज भरण्यासाठी **Apply Online** हया लिंक वर क्लिक करुन अर्ज भरण्यास सुरुवात करावी संपुर्ण अर्ज हा इंग्रजी मध्ये भरावा.

६) आपणास अर्ज करावयाचे पद निवडा एक-एक करत (Step-by-Step) आपल्यास विचारलेल्या योग्य पर्याय /माहिती भरावी.

७) आवश्यक माहिती भरल्यानंतर उमेदवारांनी ऑनलाईन पध्दतीने भरलेली माहिती सेव्ह (Save) करावी तदनंतर संगणक प्रणाली तुम्ही नोंदविलेला पासवर्ड (नोंदणी करतेवेळी) व तुमचा नोंदणी क्रमांक (**System Generated Registration Number**) संगणकाच्या स्क्रिनवर दर्शविल त्याची उमेदवारांनी काळजी पूर्वक नोंद ठेवावी.

८) संगणक प्रणालीव्दारे अर्ज भरल्यानंतर व (**Save**) केल्यानंतर कन्फर्म करण्यापूर्वी उमेदवाराला त्यामध्ये बदल करता येईल. परंतु एकदा कन्फर्म केल्यानंतर उमेदवाराला अर्जामध्ये कोणताही बदल करता येणार नाही.

९) अर्ज संगणक प्रणालीव्दारे सेव्ह केल्यानंतर सदर अर्जामध्ये भरलेली माहिती योग्य असल्याची उमेदवारांची खात्री झाल्यास उमेदवाराने अर्ज संगणक प्रणालीवर दिलेल्या “कन्फर्म ” या बटनावर क्लिक करुन अर्ज कन्फर्म करावा.

१०) उमेदवाराने कोणत्याही कारणास्तव अर्ज कन्फर्म न केल्यास त्यांचा अर्ज विचारात घेतला जाणार नाही. याची नोंद घ्यावी.

११) अर्ज कन्फर्म केल्यानंतर उमेदवारांने संपूर्ण अर्जाची प्रिन्ट आऊट काढावी. अर्जावर स्वत:चा साक्षांकित केलेला फोटो चिटकवुन व अर्जावर स्वत:ची स्वाक्षरी करुन आवश्यक त्या कागदपत्रासह जाहिरातीमध्ये दिलेल्या पत्त्यावर अंतिम दिनांकापूर्वी व वेळेच्या आत अर्ज पोहोचेल या बेताने पाठवावा. उशिरा प्राप्त झालेले अर्ज विचारात घेतले जाणार नाही याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

१२) उमेदवारांचा परीक्षा क्रमांक व परीक्षा केंद्र या कार्यालयाचे संकेतस्थळावर परीक्षेच्या आधी प्रसिध्द करण्यात येईल.

महत्वाची सूचना :- उमेदवाराने नियमितपणे वेबसाईट चेक करावी.

स्वा/-
( जी.बी.धनोकार )
सहसंचालक,
तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, मुंबई.